# महाराष्ट्र मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेड
# (नागपूर मेट्रो रेल प्रकल्प )

## १०,००,००,०००– नागपूर मेट्रोने पार केला ऐतिहासिक प्रवासी संख्या टप्पा

## १० कोटी प्रवासी – नागपूर मेट्रोचा जादुई आकडा



नागपूर: १०,००,००,००० (दहा कोटी). कोणी याला बहुराष्ट्रीय कंपनीचा पगार समजेल, तर कोणी एखाद्या मध्यम आकाराच्या भारतीय राज्याची लोकसंख्या,पण नाही – हा आकडा आहे नागपूर मेट्रोने आतापर्यंत साधलेली एकूण प्रवासी संख्या, जेव्हापासून प्रवासी सेवा सुरू झाली, तेव्हापासूनची.

ही एक महत्त्वपूर्ण उपलब्धी आहे, आणि ती केवळ आकड्यांपुरती मर्यादित नाही. ही यशोगाथा आहे महा मेट्रो नागपूरच्या अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी गेल्या काही वर्षांत केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची. मार्च २०१९ मध्ये नागपूर मेट्रोने सकाळ-संध्याकाळ मर्यादित वेळेत सेवा सुरू केली होती.

हळूहळू नागपूरकरांनी मेट्रोवर विश्वास दाखवला आणि मेट्रो ही नागपूरची वाहतूक जीवनरेखा ठरली. त्यामुळे दरवर्षी प्रवासी संख्येत लक्षणीय वाढ होत गेली. हा आकडा केवळ नागपूर मेट्रोचीच उपलब्धी नाही, तर शाश्वत शहरी वाहतुकीच्या दृष्टीने एक महत्त्वपूर्ण टप्पा आहे – जो नागपूरमधील आधुनिक सार्वजनिक वाहतुकीवरील लोकांचा वाढता विश्वास दर्शवतो.

प्रथम टप्प्याचे मेट्रो जाळे टप्प्याटप्प्याने सुरु करण्यात आले आणि त्यानुसार वर्षानुसार प्रवासी संख्या पुढीलप्रमाणे होती:

- ५५,००० (२०१८-१९)
- ९ लाख (२०१९-२०)
- १९ लाख (२०२०-२१)
- ६७ लाख (२०२१-२२)
- २.४३ कोटी (२०२२-२३)
- २.५५ कोटी (२०२३-२४)
- ३.१६ कोटी (२०२४-२५) आणि
- ९२ लाख (२०२५-२६ – १५ जुलैपर्यंत).

विशेष बाब म्हणजे, कोरोनाच्या पहिल्या लाटेदरम्यान मेट्रो सेवा पूर्णपणे बंद करण्यात आल्या होत्या, तर दुसऱ्या आणि तिसऱ्या लाटेदरम्यान सेवा मर्यादित स्वरूपात व विविध निर्बंधांसह सुरू ठेवण्यात आल्या होत्या.

या मैलाचा दगड ठरलेली कामगिरी नागपूरमधील सार्वजनिक वाहतुकीवरील वाढते अवलंबित्व आणि मेट्रोच्या माध्यमातून अधिक सुसंगत, सुलभ आणि पर्यावरणपूरक शहर उभारण्याच्या दिशेने टाकलेले भक्कम पाऊल अधोरेखित करते. विशेष म्हणजे, मेट्रोच्या सुविधांमध्ये दिव्यांग प्रवाशांसाठी रॅम्प, लिफ्ट, टॅक्टाइल मार्गदर्शक पट्ट्या व राखीव आसनांची तरतूद करून यावर अधिक भर दिल्या गेला आहे.

वाढत्या प्रवाश्यांच्या मागे एक महत्त्वाचा घटक म्हणजे विद्यार्थ्यांचा वाढता सहभाग. आज सुमारे २०% प्रवासी विद्यार्थी आहेत. हे नागपूर मेट्रोच्या विविध योजनांमुळे शक्य झाले आहे – जसे की पदवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांना महा कार्डवर ३०% सवलत व रु. १०० मध्ये दररोज अमर्याद प्रवासाची सुविधा.या सवलतीमुळे नागपूरमधील तरुणांना परवडणारी, सुरक्षित आणि सुलभ वाहतूक व्यवस्था मिळाली आहे, आणि लहान वयातच सार्वजनिक वाहतुकीच्या सवयींना प्रोत्साहन मिळाले आहे. याच विश्वासाचे प्रतीक म्हणजे १ जानेवारी २०२३ रोजी विक्रमी २.२ लाख प्रवासीसंख्या नोंदवली गेली. नागपूर मेट्रोच्या टप्पा-१ चे उद्घाटन टप्प्याटप्प्याने करण्यात आले असून, संपूर्ण प्रकल्प ११ डिसेंबर २०२२ रोजी नागपूरकरांच्या सेवेत समर्पित करण्यात आला.

केवळ वाहतूक सुधारण्यापुरतीच मर्यादा न ठेवता, नागपूर मेट्रोने पर्यावरण पूरकतेच्या दिशेनेही महत्त्वाची पावले उचलली आहेत. खासगी वाहनांऐवजी सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन देणे, आणि ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा वापर करून, नागपूरच्या कार्बन उत्सर्जनात लक्षणीय घट करण्यात मेट्रोचा मोलाचा वाटा राहिला आहे.

ही उपलब्धी नागपूरला स्मार्ट, शाश्वत आणि विद्यार्थि अनुकूल शहर बनवण्याच्या व्यापक दृष्टिकोनाशी सुसंगत आहे. जसजशी मेट्रोची व्याप्ती वाढत आहे आणि नवनवीन सुविधा दिल्या जात आहेत, तसतशी ही सेवा समाजातील सर्व स्तरांपर्यंत सुरक्षित, विश्वासार्ह व पर्यावरणपूरक वाहतूक पर्याय देण्यासाठी कटिबद्ध आहे.

नागपूर मेट्रोचा हा प्रगतीचा प्रवास इतर शहरे व महानगरांसाठीही एक प्रेरणादायी मॉडेल ठरत आहे – विशेषतः ज्यांना त्यांच्या वाहतूक प्रणालीला आधुनिकीकरणाच्या वाटेवर घेऊन जायचे आहे आणि पर्यावरणीय व सामाजिक समावेशकतेकडे वाटचाल करायची आहे.दहा कोटी प्रवाशांचा हा मैलाचा दगड,आपल्या शहरातील आधुनिक सार्वजनिक परिवहन प्रणालीवरील नागरिकांचा भक्कम व सातत्याने वाढत असलेला विश्वास दर्शवणारे खरे प्रतीक आहे.